अस्सल सोलापुरी

सुराज्य सोलापूर

। शनिवार, दि. ८ जून २०२४ ।

मोदींच्या निवडीनंतर आज भाजपचा जल्लोष

सोलापूर/प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शनिवार दिनांक ८ जून रोजी सकाळी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या खासदार बैठकीत अध्यक्षपदी निवड होणार आहे. त्यानिमित्त भाजपा कार्यालयात जल्लोष करण्यात येणार आहे, अशी माहिती शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी दिली.

भाजपच्या शहर कार्यालयात शुक्रवारी पार पडली. याबैठकीला शहराध्यक्ष काळे यांच्यासह शहर सरचिटणी विशाल गायकवाड, रोहिणी तडवळकर, पाडुरंग दिड्डी आदींची प्रमुख उपस्थित होती. या बैठकीत भाजपच्या लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाची कारणीमिमांसा करण्यात आली. शहरी भागातून भाजपाला चांगले मताधिक्य मिळाले आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप कार्यकर्त्यांनी जोमाने काम करून झालेला पराभवाचा बदला घ्यावा, असे काळे यांनी सांगितले.

संक्षिप्त वृत्त

दहा जूनपासून प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षकांच्या बदल्यांचे नियोजन

सोलापूर : सोलापूर जिल्हा परिषदेकडील प्राथमिक शिक्षण विभागाच्या बदल्या संदर्भातील अर्जांची स्वीकृती नियोजन सुरू आहे. याबाबतची कार्यवाही १० जूननंतर होईल, अशी माहिती शिक्षण अधिकारी (प्राथमिक) कादर शेख यांनी दिली. येत्या १५ जूनपासून सोलापूर जिल्हा परिषदेच्या शाळा सुरु होत आहेत. त्यानिमित्ताने शिक्षकांच्या प्रश्नांसंदर्भात चर्चा चालू आहे. सध्या प्राथमिक शिक्षण विभागाकडे २७०० पेक्षा जास्त अंतर्गत बदल्यांसंदर्भात अर्ज आले आहेत. बाहेरून जिल्ह्यात ८२ अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये प्रमोशन समायोजन, अंतर्गत बदल्या असा विषय आहे. येणाऱ्या अर्जांची छाननी करून याबाबत उपाययोजना करण्यात येईल, अशी माहितीही शेख यांनी दिली.

नागरिकांनी मतदान नोंदणीसाठी अर्ज करावेत : जिल्हाधिकारी

उत्कृष्ट नियोजनाबद्दल जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील मतदार नोंदणीसाठी निवडणूक आयोगाच्या पोर्टलवर अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहेत. शुक्रवारी, सोलापूर श्रमिक पत्रकार संघ व मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने लोकसभेच्या निवडणुकीमध्ये उत्कृष्ट काम केल्याबद्दल कुमार आशीर्वाद यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना कुमार आशीर्वाद म्हणाले, लोकसभा निवडणुकीमध्ये अनेक मतदारांना वेगवेगळ्या कारणामुळे मतदानापासून वंचित राहावे लागले. अशा मतदारांनी पुन्हा एकदा नोंदणी करावी. ज्या मतदारांच्या नावासमोर डिलीट हा शिक्का मारला आहे, त्यांची नावे तपासणी करण्यात येणार आहे. लोकसभेची प्रारूप यादी पाहूनच नवीन आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार आहे. त्यासाठी नवीन मतदान नोंदणी करावे. येत्या काही दिवसांमध्ये यासंदर्भात अभियान राबविण्यात येणार आहे, असेही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले.

आकुंभे गावाजवळ दुचाकीला अज्ञात वाहनाची बाजूने धडक

सोलापूर : ०७ जून २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास सोलापूर पुणे महामार्गावर आकुंभे गावाजवळ टेंभुर्णी वरुन अरण ला येताना दुचाकी क्रमांक एमएच ४५ डब्ल्यू २९६१ ला एका अज्ञात वाहनाने बाजूने जोरदार धडक देऊन झालेल्या अपघातात दुचाकीवरील एक तरूण डोक्याला मार लागून गंभीर जखमी तर अन्य दोन तरूण किरकोळ जखमी झाले असून सदर जखमी झालेल्याना वरवडे टोल नाका येथील रुग्णवाहिकेतून डॉ. आकाश वाघ आणि मगंध भोसले यांनी तात्काळ टेंभुर्णी येथील खासगी रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले असुन, जखमी झालेले तरूण हे अरण ता माढा येथील रहिवासी आहेत.सदर अपघाताची माहिती मिळताच वरवडे टोल नाका येथील रुग्णवाहिका पथक,मोडनिंब महामार्ग पोलीस मदत केंद्राचे प्रभारी अधिकारी श्री बालाजी साळुंखे साहेब आणि त्यांचे कर्मचारी साहेब तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

वैशाख वणवा सरला हो, मृगाचा पाऊस झरला हो...

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

गुरूवारी वैशाख वणवा सरला... शुक्रवारी मृग नक्षत्राचे आगमन झाले.पहिल्याच दिवशी या नक्षत्राने सोलापूर जिल्ह्यात धुवाँदार बरसात करून शेतकऱ्यांना दिलासादायक सलामी दिली.अजून दोन-तीन वेळेस पाऊस झाल्यानंतर खरीप पेरण्यांचा मार्ग सुकर होईल. शुक्रवारच्या पावसाने शेतकरी व खत-बि-बियाणे विक्रेते आनंदीत झाले आहे. मृगाच्या पहिल्याच पावसाने जगदीश खेबुडकर यांच्या एका धरणी आईविषयीची एक सुंदर गीत सर्वांच्या ओठी आपोआपच आले.वैशाख वणवा सरला हो,मृगाचा पाऊस आला हो... देवाची किरपा झाली, ही सुखात काया न्हाली...हेच ते गीत.

पावसाळ्याच्या नक्षत्रातील पहिल्या-वहिल्या रोहिणी नक्षत्राचे समाधानकारक दिलासा दिला नाही.पण तिने शेतकऱ्यांना आश्वस्त केले.एक-दोन पाऊस या नक्षत्रात झाला. पण कुठे पडला कुठे नाही. त्यामुळे शेतकरी वर्ग समाधानी झालाच नाही. शुक्रवारी मृग नक्षत्र निघणार म्हटल्यानंतर शेतकरी वर्गाचे लक्ष या नक्षत्राकडे लागून आहे. त्याचबरोबर ५ ते १४ जूनपर्यंत राज्यात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्याकडून दिला गेला. त्यामुळे दुधात साखरच पडली.

हवामान खात्याचा अंदाज वरूणाने खरा करून दाखवला. सोलापूर शहरात शुक्रवारी सायंकाळी धुवाँदार पाऊस पडला. मेघगर्जना आणि विजांचा कडकडाटाने आसंमत दणाणून गेला. त्या अगोदर शहरावर ढगाळ हवामान होते. अधूनमधून मेघगर्जना व्हायची पण पाऊस पडला नाही. सायंकाळी मात्र वातावरणात बदल होवून आकाश काळ्याकुट्ट ढगांनी भरून आले. त्यानंतर पावसाला सुरूवात झाली. सुमारे तासभर जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. रात्री उशिरापर्यंत शहरात संततधार पाऊस पडला.

ग्रामीण भागातही जोरदार पाऊस पडल्याचे वृत्त आहे. पंढरपूरसह तालुक्यात गुरूवारी रात्री आणि शुक्रवारी सायंकाळी मुसळधार पाऊस पडला. सांगोला तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून पाऊस पडत आहे.शुक्रवारी पावसाची रिमझिम होती. दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मोहोळ,उत्तर सोलापूर, अक्कलकोट, माढा या तालुक्यांमध्ये शुक्रवारी पाऊस झाल्याचे आमच्या प्रतिनिधींनी सुराज्यशी बोलताना सांगितले.

वणवा शमला...

सोलापूरसह जिल्ह्यात गेल्या चार-पाच दिवसांपासून पावसाळी वातावरण आहे.शुक्रवारी तर पावसाने मोठा दिलासा दिला.त्यामुळे वैखाख वणवा सरल्याने तापमानात मोठी घट झाली.शुक्रवारचे कमाल तापमान ३४.१ अंश सेल्सिअसपर्यंत गेले होते.गेल्या तीन महिन्यांपासून शहराचे तापमान ४१ अंश सेल्सिअसच्या पुढेच होते. त्यामुळे सोलापूरकरांना तगमग सहन करावी लागली होती.

पुण्यातही मुसळधार...

उजनी भरण्यासाठी पुण्यात पाऊस पडतो की नाही,याकडे सोलापूर जिल्हावासियांचे लक्ष लागून आहे.शुक्रवारी कानोसा घेतला असता गेल्या तीन-चार दिवसांपासून पुणे व जिल्ह्यात जोरदार पर्जन्यवृष्टी होत असल्याचे सांगण्यात येते.पाऊस असाच पडत राहिला तर उजनीची आशाही पल्लवित व्हायला लागेल.

भाजपचे आज वादळी आत्मचिंतन

दक्षिणमधील मताधिक्य घटल्याने कार्यकर्ते धास्तावले, रणनीती आखणार

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघाच्या भारतीय जनता पक्षाची शनिवार दि.८ जून रोजी आत्मचिंतन बैठक आयोजित करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीत या मतदार संघातील मतदारांनी भाजपकडे पाठ फिरवत महाविकास आघाडीच्या काँग्रेसच्या नूतन खासदार प्रणिती शिंदे यांना मताधिक्य दिले. त्यासंदर्भात विचारविनिमय करून आगामी विधानसभा निवडणुकीसाठी नवी रणनीती दुपारी २-०० वाजता आसरा चौकातील किल्लेदार मंगल कार्यालयात होणाऱ्या या बैठकीत आखली जाणार असल्याचे सांगण्यात आले

या मतदार संघाचे प्रतिनिधीत्व आ.सुभाष देशमुख हे करत आहेत. २०२१ आणि २०१९ या दोन निवडणुकांमध्ये त्यांनी मोठे मताधिक्य येवून बाजी मारली आहे.पण लोकसभा निवडणुकीतील भाजपचे मताधिक्य घटल्याने देशमुख समर्थक चिंतेत आहेत. पुढच्या विधानसभा निवडणुकीत आपले काय होणार, अशी भीती भाजप कार्यकर्त्यांमधून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे ही बैठक वादळी ठरण्याची शक्यता वर्तवली गेलीय. या मतदार संघात सीना-भीमा खोरे,औराद-बरूर परिसर,होटगी परिसर याभागातील अनेक गावे तसेच सोलापूर शहरातील होटगी रोड आणि विजयपूर रस्त्यांवरील अनेक प्रभागांचा समावेश आहे.शहरी आणि ग्रामीण मतदारांनी सलग दोन वेळ भाजपवर विश्वास टाकत देशमुखांना निवडून दिले. देशमुखांचे सामाजिक कार्य आणि तालुक्यातील विकास कामे यामुळे त्यांना हे यश मिळाले.मागील दोन वेळेस लोकसभा निवडणुकीतही मताधिक्य मिळवण्यात कार्यकर्त्यांनी मोठे परिश्रम घेतले होते.मात्र यंदाच्या निवडणुकीत मताधिक्य घटल्याने कार्यकर्त्यांना मोठा मानसिक धक्का बसला आहे.२०१९ च्या निवडणुकीची जेव्हा मतमोजणी सुरू होती,तेव्हा काँग्रेसचे बाबा मिस्त्री यांच्यासारख्या नवख्या उमेदवाराने भाजपला चांगलीच झुंज दिली होती.त्यांची मते जसजशी वाढत गेली,तसतसा देशमुख समर्थकांवर तणाव आला होता मात्र शेवटच्या फेऱ्यांमध्ये देशमुखांनी विजयश्री खेचून आली.लोकसभा निवडणुकीत घटलेले मतदान पाहाता कार्यकर्त्यांच्या डोळ्यापुढे हा प्रसंग उभा राहिला आहे. देशमुखांनी सतत लोकांशी संपर्क ठेवत असतात. विकास नगरमधील त्यांच्या कार्यालयात जनता दरबार भरवला जातो.लोकांच्या कामासाठी मोठा स्टाफही त्यांनी तिथे बसवला आहे. डीपीडीसी, प्रधानमंत्री आणि मुख्यमंत्री सडक योजना या योजनांमधून रस्त्यांची कामे आणून तालुक्याचा चेहरामोहरा बदलण्यात तसेच शहरातील प्रभागांमध्ये विकास कामे राबवण्यात देखमुखांनी मोठे योगदान दिले आहे मात्र,यावेळेस निर्माण झालेले मतदारांची नाराजी विधानसभा निवडणुकीत अंगलट येवू नये म्हणून ही आत्मचिंतनाची बैठक बोलावल्याचे सांगण्यात येते.

कार्यकर्ते आक्रमक

निवडणुकीच्या प्रचार काळात कार्यकर्त्यांनी रक्ताचे पाणी केले आहे.पण निवडणुकीच्या काळात कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले गेले नाही.कार्यकर्त्यांच्या भावनांची कदर केली गेली नाही,अशी तक्रार पुढे येते आहे. काही ज्येष्ठ कार्यकर्ते या बैठकीत आपल्या भावना आक्रमकपणे मांडणार असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे एकूणच ही बैठक वादळी ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.बैठकीचा खलिता काढला गेला नाही.केवळ पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मोबाईलवर बैठकीची कल्पना दिली गेली आहे.

सोलापूरकरांच्या रेल्वेसंबंधी समस्यांसाठी दिलीप माने अग्रेसर

डी.आर.एम. यांची घेतली भेट घेवून केली चर्चा

सोलापूर/प्रतिनिधी

रेल्वे गाड्या वेळेवर धावण्यासह विविध मागण्यांसाठी लक्ष देण्यासह विविध मागण्यांसाठी माजी आमदार दिलीप माने यांनी डिव्हिजन रेल्वे मॅनेजर नीरजकुमार दोहरे यांना भेटून चर्चा केली.

सर्व रेल्वे गाड्या वेळापत्रकानुसार धावण्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. वंदे भारत ही प्रवाशांसाठी अत्यंत सोयीची गाडी असून मुंबईहून चारऐवजी पाच वाजता सोडल्यास अधिक प्रवासी वाढतील असे मत व्यक्त केले.सोलापूर येथून सुटणाऱ्या सर्व गाड्या शक्यतो प्लॅटफॉर्म क्र. एकवरूनच सोडाव्यात व आणाव्यात, स्टेशनवर शुद्ध पाणी व स्वच्छतेकडे लक्ष द्यावे, स्टेशनच्या इंद्रधनूकडील भागातून प्रवेश, पार्किंग, तिकीट खिडकी व पोलीस चौकीची पूर्तता करावी, पार्किंगसाठी मुबलक जागा उपलब्ध करावी, रिक्षा व इतर वाहन व्यवस्था सुरळीत करावी. भैय्या चौक, दमाणीनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील १०० वर्षांपूर्वीचा पूल नव्याने करण्यासाठी ना हरकत द्यावी, तिलाटी स्टेशन हद्दीत नवीन सिमेंट कारखाने असून तेथील रेल्वे गेट हटवून पूल करावा, सोलापुर रेल्वे विभागात पाच तीर्थक्षेत्र असून अपंग, ज्येष्ठ नागरिक प्रवाशांना इलेक्ट्रिकल वाहन व व्हील चेअरची व्यवस्था असावी, सर्व प्लॅटफॉर्मवर अधिकृत खान-पान व्हेंडर असावेत, दिल्ली, गुजरात, दक्षिणेत जाणाऱ्या सर्व गाड्यांचा सोलापूर कोटा वाढवून द्यावा, आदी मागण्या त्यांनी मांडल्या.

यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे केतन शहा, सोमनाथ गायकवाड, चंद्रकांत कराळे, भारत अकेन, आप्पालाल इनामदार, श्रीकांत मेलगे-पाटील, सुनील जाधव, नितीन भोपळे, ईश्वर खुणे, सतीश मस्के, रवी कांबळे, श्रीकांत उडासे, शिवलिंग गौडा-पाटील, महेश वाडगे, विकास कदम आदी उपस्थित होते.

हमे चाहिए...सोलापूर 'मध्य' मतदार संघ!

- लोकसभेला साथ दिली आता विधानसभेला साथ हवी
- माजी महापौर आरिफ शेख यांनी केला दावा

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांचा विजय झाल्यानंतर काँग्रेसमध्ये ऊर्जा संचारली आहे. काँग्रेसच नेत्यांचा हुरूप वाढला आहे. काँग्रेसच्या विजयात मुस्लिम समाजाचा वाटा मोठा आहे. सोलापूर शहर मध्यमधून मुस्लिमांनी दिली साथ आहे, आता आता मतदारसंघ या समाजासाठी द्यावा, अशी मागणी माजी महापौर आरिफ शेख यांनी केली आहे.

आरिफ शेख म्हणाले, देशात भाजप सरकारकडून मुस्लिम समाजावर झालेला अन्याय तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान बदलण्याचा जो प्रयत्न सुरू होता त्याच्या विरोधात मुस्लिम समाज पेटून उठला होता. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या भारत जोडो आणि न्याय यात्रा यशस्वी राहिली ठरली. सोलापुरात त्यांनी सभा येऊन चांगले वातावरण तयार केले. आमच्या 'कुल जमात तंजीम' या संघटनेच्या वतीने सोलापुरात वातावरण तयार करण्यात आले. मागील सहा महिन्यांपासून मुस्लिम समाज काँग्रेसच्या विजयासाठी मेहनत घेत होता. ज्यांची मतदार यादीत नावे नाहीत अशांची नाव नोंदणी केली. समाजातील युवक, नव्याने लग्न करून आलेल्या मुली यांची मतदार नोंदणी करून सोलापूर शहर जिल्ह्यात सुमारे चाळीस हजारापर्यंत नवे मतदार वाढवले आहेत.

सोलापूर शहर मध्य, सोलापूर दक्षिणचा शहरी भाग या भागातील मतदान पाहिले तर ज्या भागात मुस्लिम समाजाचे मतदार आहेत त्या ठिकाणी खासदार प्रणिती शिंदे यांना एक गठ्ठा मतदान मिळाले आहे. मुस्लिम समाज ज्या ठिकाणी नाहीत अशा काँग्रेस नेत्यांच्या भागात मतांची आकडेवारी चिंताजनक आहे. त्यामुळेच प्रणिती शिंदे यांच्या विजयात मुस्लिम समाजाचा निश्चितच मोठा वाटा आहे. त्यामुळे या समाजाला यंदा शहर मध्य मधून निश्चित उमेदवारी द्यावी असे आरिफ शेख यांनी म्हटले आहे.

इतर समाजाची भूमिका काय हे पाहणेही महत्त्वाचे

खासदार प्रणिती शिंदे यांच्या विजयात यंदा मुस्लिम फॅक्टर महत्त्वाचा ठरला आहे. त्यामध्ये मराठा समाज, मुस्लिम समाज, मागासवर्गीय समाज, मोची समाज यांचा समावेश आहे. मात्र आता मतदार संघ मुस्लिम समाजाला सोडावा अशी मागणी शेख यांनी केली आहे. त्यामुळे आता इतर समाजातील नेत्यांची यावर काय भूमिका असणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

पक्ष श्रेष्ठींच्या भूमिकेकडे लक्ष

शहर मध्यमधून एमआयएमचे फारूक शाब्दी रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत जर काँग्रेसने ही जागा मुस्लिम समाजाचा सोडण्याचा निर्णय जर घेतला तर समाजाच्या मतांमध्ये विभागणी होण्याची शक्यता आहे. याचा थेट फायदा भाजप किंवा सेनेच्या उमेदवारांना होणार यात शंका नाही. शहर मध्यमध्ये जरी मुस्लिम समजाने काँग्रेसला मतदान केले असले तरी इतर समाजाचे मतदान भाजपला मोठ्या संख्येने झाले आहे. त्यामुळे शेख यांच्या या मागणीचा पक्षश्रेष्ठी किती गांभियाने विचार करतात यावर पुढचे राजकारण अवलंबून असणार आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा महापालिकेच्या बाजूने निर्णय

२५६ कोटी रुपये वाचले

प्रत्यक्षात पाणी उपशाप्रमाणे ४०.७३ कोटी रक्कम भरण्यावर शिक्कामोर्तब

सोलापूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने जलसंपदा विभागाचे ३० डिसेंबर २०१७ व दि.७ मार्च २०१८ रोजीचे आदेश रद्द करून प्रत्यक्षात पाणी उपशानुसार आकारणी करण्याबाबत सोलापूर महापालिकेच्या बाजूने निर्णय दिला आहे. जलसंपदा विभागाने अवाजवी आकारलेल्या २९६.७९ कोटी रुपये ऐवजी प्रत्यक्षात उपशाप्रमाणे सोलापूर महापालिकेने ४०.७३ कोटी इतकी रक्कम भरण्यावर शिक्कामोर्तब केला आहे. या निर्णयामुळे महापालिकेचे २५६.०६ कोटी रुपये वाचले आहेत.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने जलसंपदा विभागाच्या आदेशामुळे जलसंपदा विभागाच्या भीमा विकास विभाग क्र.०२, सोलापूर कडून आवर्तनाप्रमाणे नोव्हेंबर २०१५ पासून ते सप्टेंबर २०२३ अखेर होणारी २९६.७९ कोटी रक्कम देण्याचे आदेश होते. मात्र प्रत्यक्षात उपशाप्रमाणे ४०.७३ कोटी इतकी रक्कम होत आहे. त्यापैकी सोलापूर महापालिकेने ४०.४९ कोटी इतकी रक्कम भरलेली आहे. तसेच सोलापूर महापालिकेकडून जलसंपदा विभागास तिन्ही योजनेसाठी एका वर्षाकरीता साधारणतः १८ कोटी इतकी पाणीपट्टीची रक्कम नियमित अदा

केली जाते.

महापालिकेकडून शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी यशवंत जलाशय योजना (उजनी हेड वर्क्स), भीमा नदी योजना (टाकळी हेड वर्क्स) व एकरूख मध्यम प्रकल्प (हिप्परगा तलाव) या तिन्ही योजनेतून पाणी उपसा केले जाते. प्रत्यक्षात उपसानुसार जलसंपदा विभागाच्या संबंधीत विभागास पाणीपट्टीची देयके अदा केली जातात.

जलसंपदा विभागाच्या भीमा विकास विभागाने नोव्हे २०१५ पासून शासनाने अवर्षण वर्ष (दुष्काळ) जाहीर केले नसतानाही सन २००४ च्या शासन निर्णयानुसार केलेल्या अवाजवी आकारणी बाबत महापालिकेकडून प्राधिकरणाकडे याचिका दाखल केली होती. या याचिकेवर अंतिम सुनावणी झाल्यानंतर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने जलसंपदा विभागाचे आदेश रद्द करून प्रत्यक्षात उपशानुसार आकारणी करण्याबाबत महानगरपालिकेच्या बाजूने निर्णय दिलेला आहे.

या प्रकरणी महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांचे नेतृत्वाखाली महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे व त्यांची टिम संतोष यलगुलवार सहाय्यक अभियंता, नितीन अंबिगार, कनिष्ठ अभियंता व तसेच उप अभियंता नीलकंठ मठपती यांनी प्रयत्न केले आहेत.

आता पालिकेला केवळ २४ लाख भरावे लागणार

प्राधिकरणाच्या आदेशामुळे नोव्हे २०१५ पासून ते माहे सप्टेंबर २०२३ अखेर होणारी २९६.७९ कोटी ही प्रत्यक्षात उपशाप्रमाणे ४०.७३ कोटी इतकी रक्कम होत आहे. त्यापैकी सोलापूर महानगरपालिकेने ४०.४९ कोटी इतकी रक्कम भरलेली आहे. यामुळे आता केवळ महापालिकेला २४ लाख रुपये भरावयाचे आहेत.